

## विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी शिक्षण समूह, पुणे, भारत
## आणि
## भारत अस्मिता फाऊंडेशन, पुणे

# ‘राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड राज्यस्तरीय पुरस्कार-२०१४’



## डॉ. प्राची व्ही. पवार, शरणपूर रोड, नाशिक
## यांना ‘आरोग्यरत्न पुरस्कार’ सन्मानपूर्वक सादर

आपला भारत देश हा ऋषीमुनींचा, साधुसंतांचा, सतिसाध्वींचा, संत-सज्जनांचा, शूर-वीरांचा देश म्हणून ओळखला जातो. इथे त्याग शिकावा, निर्लेपता शिकावी, स्वाभिमान शिकावा, वचनपूर्ती शिकावी, नैतिकता शिकावी, निगर्वता शिकावी, नम्रता शिकावी, सहिष्णुता शिकावी आणि सर्वधर्मसमभावही शिकावा, अशी ही पुण्यभूमी आहे. सत्य व ज्ञानाची पूजा करणाऱ्या अशा या हजारो वर्षापासूनच्या पुरातन भारत वर्षात जन्म मिळणे कठीण आणि त्याहूनही महाराष्ट्रात जन्म मिळणे हे दुरापास्त आहे, असं म्हणतात-

**दुर्लभं भारते जन्म । महाराष्ट्रे सुदुर्लभम् ॥**

अशा या महाराष्ट्राला सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, अध्यात्मिक, क्रीडा क्षेत्रांमधील थोर नररत्नांची परंपरा लाभलेली आहे. या थोर नररत्नांचे जीवनचरित्र म्हणजे अत्यंत त्यागमय व समर्पित जीवनाची मालिकाच असल्याचे, आपणास पदोपदी जाणवेल.

ज्ञाननिष्ठा, धर्मनिष्ठा व राष्ट्रनिष्ठा यांचे मूर्तिमंत प्रतिक असलेल्या या सत्पुरुषांचा वारसा राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड यांनी अतिशय यशस्वीपणे पुढे चालविला.

**जे जे भेटे भूत । तयासी मानिजे भगवंत ॥ आणि**
**जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ॥**
**तोचि साधु ओळखावा । देव तेथेची जाणावा ॥**

या जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराजांच्या वचनांवर अढळ श्रद्धा-निष्ठा ठेऊन, दादाराव कराड यांनी आयुष्यभर निरपेक्षपणे गोरगरीब, दीन-दुबळ्या जनतेची सेवा केली. या दीनदुबळ्या, गोरगरीब लोकांमध्येच दादांनी देव बघितला. दादांच्या या विविध लोकोपयोगी कार्यामुळेच दादाराव कराड रामेश्वर पंचक्रोशीतील लोकांचे आदर्श बनले, वंदनीय बनले.

राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड यांनी आयुष्यभर जपलेल्या सामाजिक बांधिलकीचा वारसा आज आपण यशस्वीरीत्या पुढे चालवित आहात, याचा आम्हाला अतिशय अभिमान वाटतो.

‘नीलवसंत फाउंडेशन’च्या माध्यमातून आपण नेत्रचिकित्सेच्या क्षेत्रामध्ये अत्यंत मोलाची कामगिरी बजावत आहात ह्याचे आम्हाला विशेष कौतुक वाटते. एक हजारच्या वर ग्रामीण व शहरी भागातील नेत्र रुग्णांवर आपण विनामूल्य शस्त्रक्रिया केल्या आहेत ही अतिशय गौरवास्पद बाब आहे. आपण केवळ एक कुशल नेत्रतज्ञ नसून नि:स्वार्थी वृत्तीच्या सेवाव्रतीही असल्याचेच हे द्योतक आहे.

अंधपणा, मोतीबिंदू, काचबिंदू अशासारख्या दुर्धर व्याधींवर इलाज करुन आपण रुग्णांना जणू नवसंजीवनीच देत आहात असे आम्हाला वाटते. नेत्रचिकित्सेबरोबरच, गावं दत्तक घेऊन त्यांचा सर्वांगीण विकास घडविण्याचे कार्य आपल्या हातून होत आहे ह्याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो.

असीम जिद्द, अथक परिश्रम, सामाजिक परिस्थितीची जाणीव व विजिगीषु वृत्ती, ही आपली वैशिष्ट्ये आहेत. ज्यामुळे आपण आज यशस्वी झाला आहात.

**नि:स्वार्थी कार्य, त्यागावर आधारलेली संस्कृती ही भारतीयांची जीवनमूल्ये आहेत. आपण आयुष्यभर अतिशय नि:स्वार्थीपणे केलेल्या आरोग्यसेवा कार्याबद्दल हा ‘राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड राज्यस्तरीय पुरस्कार-२०१४’ चा ‘आरोग्यरत्न पुरस्कार’ आज मंगळवार, दि. २ सप्टेंबर २०१४ रोजी भारताचे माजी उपपंतप्रधान व ज्येष्ठ भाजपा नेते खा. मा. श्री. लालकृष्ण अडवाणी यांच्या शुभहस्ते, तसेच कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मा. डॉ. पंडित बी. विद्यासागर यांच्या सन्माननीय उपस्थितीत प्रदान करताना आम्हाला अतिशय आनंद व आंतरिक समाधान वाटत आहे.**

## आपले स्नेहांकित

**डॉ. विजय भटकर**
अध्यक्ष,
इंडिया इंटरनॅशनल मल्टिव्हर्सिटी, पुणे

**डॉ. सुरेश गो. घैसास**
अध्यक्ष, माईर, पुणे

**प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड**
संस्थापक अध्यक्ष, विश्वशांती केंद्र (आळंदी),
माईर्स एमआयटी, पुणे

**प्रा. डॉ. मंगेश तु. कराड**
सचिव व विश्वस्त,
माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूह, पुणे

**प्रा. राहुल विश्वनाथ कराड**
उपाध्यक्ष व विश्वस्त
माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूह, पुणे